N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** अहिल्यानगर **P.S.(ठाणे):** राहुरी

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0753 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 01/07/2026 02:37

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार
   **Time Period (कालावधी):** पहर 5
   **Date From (दिनांक पासून):** 30/06/2026
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 30/06/2026
   **Time From (वेळेपासून):** 12:50 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 15:05 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 30/06/2026 **Time (वेळ):** 23:01 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 003

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 01/07/2026 02:29 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 22 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** ग्रामपंचायत सात्रळ ,सात्रळ

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** पोनि सविता देविदास तांबे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1990

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,नगर,राहुरी,अहिल्यानगर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,नगर,राहुरी,अहिल्यानगर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9834891019

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | हैदर याकुब पटेल | | | 1. वंदावण कालनी.श्रीरामपुर.राहुरी. अहिल्यानगर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | ज्ञानदेव मोहन डुकरे | | | 1. सात्रळ ग्रामपंचायत,ताराहुरी ज, राहुरी,अहिल्यानगर,महाराष्ट्र, भारत |
| 3 | सचिन हौसिराम ब्राम्हणे | | | 1. समता नगर,वेताळ बाबा चैक, लोणी,राहुरी,अहिल्यानगर, महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय रुपया | रोख स्वरुपात त्यात वेगवेगळ्या दराच्या नोटा | 20,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

20,000.00

**11. Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी सविता देविदास तांबे, वय - 36 वर्षे, पोलीस निरीक्षक, नेमणुक -लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल्यानगर, मो.नं.9834891019.

समक्ष राहुरी पोलीस स्टेषन येथे हजर होवुन सरकार तर्फे फिर्यादी होवुन फिर्याद लिहुन देते की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल्यानगर येथे पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत आहे.

दि.29/06/2026 रोजी आम्ही दैनंदिन कर्तव्यावर हजर असतानां आम्हाला श्री.अजित त्रिपुटे, पोलीस उपअधिक्षक, ला.प्र.वि.अहिल्यानगर यांनी त्यांचे कक्षात बोलावुन कळविले की, एक तक्रारदार यांनी दुरध्वनीवरुन संपर्क करुन त्यांचेकडे एक लोकसेवक लाचेची मागणी करीत असल्याबाबत सांगितले असुन सदर तक्रारदार यांची सात्रळ,ता.राहुरी,जि.अहिल्यानगर येथे जावुन भेट घेवुन पुढील कार्यवाही करणेबाबत आम्हांस सांगितले. त्यानंतर आम्ही मा.कार्यकारी अभियंता,मृद व जलसंधारण विभाग,अहिल्यानगर यांना पत्र देवुन त्यांच्याकडुन पंच उपलब्ध करुन घेतले. पंच कार्यालयात हजर झाल्यानंतर आम्ही दोन्ही पंचांना आमची, तसेच कार्यालयात हजर असलेले पोनि आल्हाट,पोना/709 चंद्रकात काळे, पोका◌ॅ/ 2262 षेखर वाघ यांची आपासं◌ात ओळख करून दिली व त्यानंतर दोन्ही पंचांना तक्रारदार यांचे तक्रारीबाबत थोडक्यात माहिती देवुन दोन्ही पंच,ला.प्र.वि.कार्यालयातील पोनि आल्हाट,पोना/काळे,पोका◌ॅ/वाघ यांना तक्रारदार यांचे लाचमागणी तक्रारीचे अनुशंगाने सात्रळ,ता.राहुरी,जि. अहिल्यानगर येथे जावुन कारवाई करण्याचे अनुशंगाने दिनांक 30/06/2026 रोजी 09/30 वा.लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अहिल्यानगर येथे हजर राहण्याच्या सुचना दिल्या.

दिनांक 30/06/2026 रोजी आम्ही सुचना दिल्याप्रमाणे दोन्ही पंच,पोनि आल्हाट,पोना/काळे व पोका◌ॅ/वाघ असे ला.प्र.वि.कार्यालयात हजर झाले. आम्ही सापळा पथकास सापळा कारवाईकामी आवष्यक असलेले सर्व साहित्य सोबत घेण्यास सांगुन आम्ही, दोन्ही पंच, पोनि आल्हाट व सापळा पथकातील कर्मचारी असे सर्व साहित्यानिषी षासकीय वाहन क्रं. एम.एच.16, डी.डब्ल्यु.7014 ने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल्यानगर कार्यालयातुन रवाना होवुन राहुरी-राहुरी फॅक्टरी-गुहा मार्गे सात्रळ ता.राहुरी,जि.अहिल्यानगर येथे सुरक्षित ठिकाणी पोहचलो. तक्रारदार महेष दिंगबर कडु हे त्यांचे मोटार सायकलसह सुरक्षित ठिकाणी हजर होते. तेव्हा आम्ही त्यांना षासकीय वाहनात बसवुन घेवुन त्यांना आमची ओळख देवुन दोन्ही पंचांची व सापळा पथकांची ओळख करुन दिली. तसेच तक्रादार श्री.कडु यांची ओळख करुन घेतली. तेव्हा त्यांनी आम्हांस पंचासमक्ष त्यांच्या तक्रारीची तोंडी हकीगत सांगितली ती पुढील प्रमाणे.

मी ग्रामपंचायत सात्रळ,ता.राहुरी येथे प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण योजनेअंतर्गत घरकुल मिळणेकामी अर्ज केला होता. त्यानंतर सन 2023 मध्ये घरकुल मंजुर झालेबाबत मला ग्रामपंचायत सात्रळ येथुन माहीती मिळाली.त्यानंतर दि.11/02/2025 रोजी घरकुलाचे बांधकाम करण्याकरीता अनुदानाचा पहिला हप्ता 15,000/- रुपये माझे आयसीआयसीआय बॅकेच्या खात्यामध्ये जमा झाला होता.त्यावेळी मी घरकुलाचे पहिल्या टप्याचे बांधकाम सुरु केले. घरकुल अनुदानाचा पहिला हप्ता माझे बॅक खातेवर जमा झालेनंतर ग्रामपंचायत कार्यालय सात्रळ,ता.राहुरी येथील क्लर्क ज्ञानदेव डुक्रे यांनी माझेकडे घरकुलाचे बांधकाम करण्याकरीता अनुदानाचा पहिला हप्ता जमा झाला

म्हणुन व घरकुलाच्या अनुदानाचे पुढील हप्ते मंजुर करण्याच्या प्रक्रियेकरीता मदत करण्यासाठी 3,000/- रूपयांची मागणी केली होती. त्यावेळी मी नाईलाजास्तव घरकुलाचे अनुदानाचे पुढील हप्ते मिळण्यासाठी ज्ञानदेव डुक्रे यांना फोन पे द्वारे 3,000/- रुपये आ◌ॅनलाईन पध्दतीने पाठविले होते.त्यानंतर मला माझे घराचे दुसÚया टप्याचे काम पुर्ण झालेनंतर क्लर्क ज्ञानदेव डुके◌्र यांचेसोबत पंचायत समिती,राहुरी येथील इंजीनियर सचिन ब्राम्हणे असे माझे घरकुलाचे बांधकाम करण्यासाठी चे बांधकामाचे फोटो काढणेकरीता सुमारे 7 महिन्यापुर्वी आले होते.त्यावेळी क्लर्क डुक्रे यांनी मला घरकुलाच्या बांधकामाकरीता येणारा अनुदानाचा दुसरा हप्ता 70,000/- रूपये तसेच त्यापुढील हप्ते मंजुर करण्याच्या प्रक्रियेमध्ये मदत करण्यासाठी घरकुलाच्या अनुदानाचा पहिला हप्ता 70,000/- रूपये जमा झालेनंतर 20,000/- रुपये इंजिनिअर ब्राम्हणे व ग्रामसेवक पटेल यांना दयावे लागतील असे म्हणुन माझेकडे लाचेची मागणी केली.

दि.22/06/2026 रोजी घरकुल बांधण्याकरीता मिळणारा अनुदानाचा दुसरा हप्ता 70,000/- रुपये माझ्या आयसीआयसीआय बॅकेच्या खात्यावरती जमा झाला,त्यानंतर दि.28/06/2026 रोजी मला ग्रामपंचायत सात्रळ ये◌ेथील क्लर्क ज्ञानदेव डुके◌्र मला भेटले व तुझा घरकुलाचे बांधकामाचा अनुदानाचा दुसरा हप्ता 70,000/- रू. जमा झाला आहे त्यासाठी इंजिनिअर ब्राम्हणे व ग्रामसेवक पटेल यांनी मदत केली आहे तसेच उर्वरित घरकुल बांधकामाकरीता मिळणारे हप्ते मंजुर करण्याकरीता इंजिनिअर ब्राम्हणे व ग्रामसेवक पटेल तुला मदत करतील त्यासाठी इंजिनिअर ब्राम्हणे व ग्रामसेवक पटेल यांचेकरीता तुला 20,000/- रुपये दयावे लागतील असे सं◌ागुन माझे कडे लाचेची मागणी केली.त्यामुळे माझे लक्षात आले की,ज्ञानदेव डुके◌्र हे◌े माझ्याकडे इंजिनिअर ब्राम्हणे व ग्रामसेवक पटेल यांचेकरीता लाचेची मागणी करीत आहे.मला त्यांना लाच देण्याची ईच्छा नाही.

तक्रारदार श्री.कडु यांनी सांगितलेली तक्रार त्यांचे स्वहस्ताक्षरामध्ये लिहुन घेवुन त्यावर त्यांनी,दोन्ही पचं व आम्ही सहया केल्या.तक्रारदार श्री.कडु यांच्या तक्रारीची पडताळणी करणेकामी तक्रारदार व दोन्ही पंचाना योग्य त्या सुचना देवुन आमचे सुचनेवरून पोनि आल्हाट यांनी तक्रारदार यांना व्हाईस रेका◌ॅर्ड च्या वापराबाबत माहीती देवुन व्हाईस रे◌ेका◌ॅर्ड मध्ये नविन मेमरी कार्ड टाकुन ते व्हाईस रेका◌ॅर्डर चालु करुन तक्रारदार यांचे गळयात कोणास दिसणार नाही अषा पध्दतीने अडकवुन तक्रारदार श्री.कडु व पंच क्र.1 यांना लोकसेवक डुक्रे,लोकसेवक ब्राम्हणे व लोकसेवक पटेल यांची सात्रळ ग्रामपंचायत ता.राहुरी जि-अहिल्यानगर येथे भेट घेण्यासाठी तक्रारदार यांचे दुचाकीवरून ने 12/50 रवाना केले. त्यानंतर तक्रारदार श्री.कडु व पंच नं. 1 हे आम्ही थांबलेल्या सुरक्षीत ठिकाणी 13/16 वा. परत आले.त्यावेळी आमचे सुचनेवरून पोनि आल्हाट यांनी तक्रारदार श्री.कडु यांचेकडील व्हा◌ॅईस रेका◌ॅर्डर ताब्यात घेवुन बंद केला.त्यानतर आम्ही तक्रारदार श्री.कडु व पंच क्र.1 यांना पंच क्र.2 यांचे समक्ष घडलेल्या हकिगतीबाबत विचारले असता त्यांनी सांगितले की, लोकसेवक डुक्रे यांची ग्रामपंचायत सात्रळ ता.राहुरी येथील कार्यालयात जावुन भेट घेतली त्यावेळी लोकसेवक डुक्रे यांच्यात तक्रारदार यांचेमध्ये तक्रारदार यांचे कामाबाबत चर्चा झाली. त्यावेळी लोकसेवक डुक्रे यांनी तक्रारदार श्री.कडु यांचेकडे तक्रारदार यांचे घरकुल बांधकामाकरीता अनुदानाचा पहिला हप्ता 70,000/- रू. मंजुर करण्याच्या प्रक्रियेमध्ये मदत केल्याचे मोबदल्यात तसेच घरकुल बांधकामाकरीता मिळणा-या अनुदानाचे पुढील हप्ते मंजुर करण्याच्या प्रक्रियेमध्ये मदत करण्याकरीता 20,000/- रुपये लाचेची मागणी करुन सदर पैसे◌े लोकसेवक सचिन ब्राम्हने तसेच लोकसेवक पटेल यांना दयायचे सांगुन तक्रारदार यांना त्यांची लोकसेवक पटेल यांचेषी भेट घालुन देतो,व पैसे घेवुन ये तुला लोकसेवक ब्राम्हने यांचा फोन लावुन देतो असे सांगितले परंतु त्यावेळी ग्रामपंचायत कार्यालयात मिटींग चालु असल्याने लोकसेवक पटेल यांची भेट घेता आली नाही,अषी हकिगत सांगितली.सदर कथन केलेल्या हकिगतीवरून व डिजीटल व्हा◌ॅईस रेका◌ॅर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत झालेले तक्रारदार श्री.कडु व लोकसेवक डुक्रे यांचेतील भेटी दरम्यान झालेले संभाषण ऐकले असता लोकसेवक डुक्रे यांनी तक्रारदार यांच्याकडे तक्रारदार श्री.कडु यांचे घरकुल बांधकामाकरीता अनुदानाचा पहिला हप्ता 70,000/- रू. मंजुर करण्याच्या प्रक्रियेमध्ये मदत केल्याचे मोबदल्यात तसेच घरकुल बांधकामाकरीता मिळणा-या अनुदानाचे पुढील हप्ते मंजुर करण्याच्या प्रक्रियेमध्ये मदत करण्याकरीता लोकसेवक पटेल व लोकसेवक ब्राम्हणे यांचेकरीता 20,000/- रुपये लाचेची मागणी केल्याची आमची व दोन्ही पंचाची खात्री झाली. लोकसेवक डुक्रे यांनी तक्रारदार श्री.कडु यांचेकडुन पैसे मिळाल्यानंतर लोकसेवक बा◌्रम्हणे यांना फोन लावुन देतो व तसेच लोकसेवक पटेल यांची भेट घालुन देतो असे लोकसेवक डुक्रे यांनी सांगितल्याने लोकसेवक पटेल यांची लाच मागणी पडताळणी करण्याचे ठरले.

त्याप्रमाणे आम्ही लोकसेवक पटेल यांची पडताळणी करण्याकरीता तक्रारदार व पंच क्र 1 यांना योग्य त्या सुचना देवुन आमचे सुचनेवरून पोनि आल्हाट यांनी व्हाईस रेका◌ॅर्डर चालु करुन ते कोणास दिसणार नाही अषा पध्दतीने तक्रारदार श्री.कडु यांचे गळयात अडकवुन देवुन तक्रारदार श्री.कडु व पंच क्र.1 यांना लोकसेवक पटेल यांची भेट घेणे करीता सात्रळ,ग्रामपंचायात येथे 14/03 वा.चे सुमारास तक्रारदार यांचेकडील दुचाकी वाहनाने रवाना केले.

त्यानंतर तक्रारदार व पंच क्र 1 असे आम्ही थांबलेले सुरक्षीत ठिकाणी 14/21 वा. परत आले.आमचे सुचनेवरून पोनि आल्हाट यांनी तक्रारदार यांचे कडील व्हाईस रेकाॅर्डर ताब्यात घेवुन तो बंद केला,त्यानंतर आम्ही तक्रारदार व पंच क्र.1 यांना पंच क्र.2 यांचे समक्ष घडलेल्या हकिगतीबाबत विचारले असता त्यांनी सांगितले की, तक्रारदार श्री.कडु यांनी लोकसेवक डुक्रे यंाचेसह जावुन लोकसेवक पटेल यांची भेट घेतली.त्यावेळी लोकसेवक पटेल यांनी तक्रारदार श्री.कडु यांचेकडुन घरकुलाचे बांधकामाबाबत माहिती घेतली व मिळणा-या अनुदानाबाबत तक्रारदार श्री. कडु यांना संागुन तुझे 1,70,000/- रुपये बिल मंजुर होत आहे.तरी तुला 20,000/- रुपये दयायला काय हरकत आहे असे म्हणुन लाचेची मागणी केल्याची हकीगत सांगितली.त्यानंतर आम्ही डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत झालेले संभाशण ऐकले असता त्यामध्ये लोकसेवक पटेल हे तक्रारदार श्री.कडु यांना म्हणाले की,काय तुमची कामाची स्टेज काय हे... त्यावर तक्रारदार श्री.कडु लोकसेवक पटेल यांना म्हणाले की, स्टेज अषी कामाची...का मी फायनल केलय...आता त्याच्या खिडक्या ...नाय नविनच हे काम....कामाच काय नाय ? तेव्हा लोकसेवक पटेल तक्रारदार यांना म्हणले की,तुम्हाला दोन वर्शे झालेत... तेव्हा तक्रारदार श्री.कडु म्हणाले की,आता तुमच्या कड तुम्हाला माहीतीय राव... तेव्हा लोकसेवक पटेल तक्रारदार यांना म्हणाले की,आयका ना ? एक विस हजार,प्लस पन्नास हजार, एक सत्तर हजार मिळु राहीलेत ..... तुम्हाला वीस दयायला तिथ काय अडचण हे.... हे ध्वनीमुदित झालेले संभाशण व्हाईस रेकाॅर्डर मध्ये ऐकले असता लोकसेवक पटेल यांनी तक्रारदार श्री.कडु यांचेकडे त्यांचे घरकुल बांधकामाकरीता अनुदानाचा पहिला हप्ता 70,000/- रू. मंजुर करण्याच्या प्रक्रियेमध्ये मदत केल्याचे मोबदल्यात तसेच घरकुल बांधकामाकरीता मिळणा-या अनुदानाचे पुढील हप्ते मंजुर करण्याच्या प्रक्रियेमध्ये मदत करण्याकरीता 20,000/- रुपये लाचेची मागणी केल्याची आमची व दोन्ही पंचाची खात्री झाली.लाच मागणी पडताळणी दरम्यान लोकसेवक डुकेर यांनी तक्रारदार श्री.कडु यांना लाचेची रक्कम घेवुन श्री.जगताप यांचे किराणा दुकानाचे ठिकाणी बोलाविलेले असल्याने लोकसेवक डुक्रे यांचे विरोधात श्री.जगताप यांचे किराणा दुकानाचे ठिकाणी सापळा कारवाई आयोजित करण्याचे सर्वानुमते ठरले.

त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना लाचेची रक्कम हजर करण्यास कळविले असता, त्यांनी त्यांचे बचतीतुन 20,000/- रक्कम त्यात 500 रुपये दराच्या 40 भारतीय चलनी नोटा हजर केल्या. सदर नोटांचे नंबर कोÚया कागदावर लिहिण्यात आले. तो कागद पंच नं. 2 यांचे कडे देण्यात आला. आम्ही सदर सापळा कारवाईमध्ये अॅन्थ्रासिन पावडर व अल्ट्राव्हाॅयलेट दिवा यांचे गुणधर्माबाबत माहिती देवुन त्याबाबतचे प्रात्यक्षिक पोकाॅ/वाघ यांनी करुन दाखविले. तक्रारदार यांनी हजर केलेल्या नोटांना अॅन्थ्रासिन पावडर लावण्यात आली. सदर लाच रक्कम तक्रारदार यांचे पॅन्टच्या उजव्या बाजुच्या खिषात ठेवुन दिली. त्यानंतर आम्ही तक्रारदार, दोन्ही पंचाना व सापळा पथकास आवष्यक त्या सुचना दिल्या व तक्रारदार यांना कळविले की, त्यांनी श्री.जगताप यांचे किराणा दुकानाचे ठिकाणी जावुन लोकसेवक डुक्रे यांची भेट घ्यावी. लोकसेवक डुक्रे यांनी लाचेची रकमेची मागणी केल्यास पॅन्टच्या उजव्या बाजुच्या खिषात ठेवलेली लाचेची रक्कम त्यांना दयावी व लाच स्विकारले नंतरचा नियोजित इषारा करावा अषा व इतर पुरक सुचना देण्यात आल्या. त्यानंतर आमचे सुचनेवरून पोनि आल्हाट यांनी व्हाॅईस रेकाॅर्डरमध्ये एक नविन मेमरीकार्ड टाकुन व्हाॅईस रेकाॅर्डर चालु करून ते तक्रारदार यांचे गळयात कोणास दिसणार नाही अषा पध्दतीने अडकुन दिले.त्यानंतर तक्रारदार व पंच नं. 1 यांना लोकसेवक डुक्रे यांची भेट घेण्यासाठी तक्रारदार यांच्या दुचाकी वाहनाने 14/48 वाजता रवाना केले. त्यांचे पाठोपाठ आम्ही सोबत सापळा पथक रवाना होवुन सात्रळ गांव ते तांभेरे रोड वरील संजय जगताप यांचे किराणा दुकाण जवळ,सात्रळ ता.राहुरी येथे जावुन आजुबाजुस सापळा लावुन थांबलो. सापळा पथक आल्याची खात्री झाल्यानंतर तक्रारदार श्री.कडु व पंच नं. 1 असे दुचाकी वरुन उतरुन तक्रारदार श्री.कडु यांनी लोकसेवक डुकेर यांना फोन करुन त्याठिकाणी थांबुन राहिले त्यानंतर काहि वेळाने लोकसेवक डुक्रे हे सदर ठिकाणी आल्यानंतर तक्रारदार श्री.कडु यांची भेट घेतली. त्यांची भेट झाल्यानंतर लोकसेवक डुकेर यांनी तक्रारदार यांचेकडुन लाचेचे पैसे स्विकारले नंतर तक्रारदार यांनी त्यांचा डावा हात डोक्यावरुन फिरवुन लाच स्विकारले बाबतचा पुर्व नियोजीत इषारा केला. लागलीच आम्ही पंच नं. 2 व सापळा पथकासह जावुन तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेकाॅर्डर आमचे सुचनेवरून पोना/काळे यांनी ताब्यात घेवुन ते बंद केले व तक्रारदार व पंच नं.1 यांना लाचेची रक्कम कोणी स्विकारली व कोठे ठेवली आहे याबाबत विचारले असता त्यांनी समोरील इसमाकडे बोट दाखवुन सांगितले की, हे लोकसेवक डुकेर आहेत त्यांनी लाचेची रक्कम उजव्या हाताने स्विकारून मी मोजुन घेतली व त्यांच्या हातातच ठेवलेली आहे. त्यानंतर आम्ही सदर इसमास त्यांचे नाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव ज्ञानदेव मोहन डुुकेर,वय-43 वर्शे, लिपीक (कंत्राटी),सात्रळ ग्रामपंचायत,ता.राहुरी जि-अहिल्यानगर, रा.डुक्रेवाडी, कॅनाॅलजवळ,सात्रळ ता.राहुरी जि.अहिल्यानगर असे सांगितले. त्यानंतर लोकसेवक डुक्रे यांचे हातात असलेली लाचेची रक्कम पंच नं.2 यांचेकरवी ताब्यात घेवुन त्यामध्ये लाचेच्या नोटा असल्याची खात्री केली. त्यानंतर आम्ही लोकसेवक डुकेरे यांना षासकीय वाहनात सोबत

घेवुन सापळा पथकासह सुरक्षित ठिकाणी आलो. लोकसेवक डुक्रे यांना ताब्यात घेतल्यानंतर लोकसेवक डुक्रे यांनी सदर लाच रक्कम लोकसेवक पटेल व लोकसेवक ब्राम्हणे यांचेकरीता स्विकारलेली असल्याचे त्यांनी सांगुन खात्री करून देण्यासाठी लोकसेवक ब्राम्हणे यांना फोन करून लाच रक्कम त्यांचे सांगणेवरून स्विकारल्याची खात्री करून देतो असे सांगितले.लाचमागणी पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक डुके्र यांनी तक्रारदार श्री.कडु यांना पैसे आणल्यानंतर लोकसेवक ब्राम्हणे यांना फोन लावुन बोलणे करून देतो असे सांगितले होते,त्याप्रमाणे लोकसेवक डुक्रे यांनी स्विकारलेल्या लाचरकमेमध्ये लोकसेवक ब्राम्हणे यंाचा सहभाग आहे अगर कसे? याची पडताळणी करण्याचे सर्वानुमते ठरले.त्याप्रमाणे आम्ही दिलेल्या सुचनेप्रमाणे लोकसेवक डुक्रे यांनी त्यांचे 8975674341 या मोबाईलक क्रमांकावरुन लोकसेवक ब्राम्हणे यांच्या 8087544804 या मोबाईल क्रमांकावर फोन केला असता लोकसेवक ब्राम्हणे यांनी लोकसेवक डुके्र यांना तक्रारदार यांचे कडुन लाचेची रक्कम 20,000/- रूपये स्विकारण्यास सांगुन लोकसेवक डुक्रे यांना लाच स्विकारण्यास प्रोत्साहन दिल्याचे निश्पन्न झाले.त्यानंतर आम्ही लोकसेवक डुक्रे सापळा पथक,पंच असे ग्रामपंचायत कार्यालय,सात्रळ येथे आल्यानंतर तेथे हजर असलेले लोकसेवक पटेल यांना ताब्यात घेवुन त्यांना आमची ओळख सांगुन त्यांना त्यांचे नाव व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव हैदर याकुब पटेल, वय-56 वर्शे, पद-ग्रामसेवक,सात्रळ ग्रामपंचायत ता.राहुरी जि.अहिल्यानगर रा.वृंदावण काॅलनी,श्रीरामपुर रोड, राहुरी फॅक्टरी,ता.राहुरी,जि-अहिल्यानगर असे सांगितले.त्यानंतर आम्ही ग्रामपंचायत कार्यालय,येथील एक कक्ष उपलब्ध करून घेवुन सदर कक्षामध्ये आवष्यक तो अंधार करून लोकसेवक डुक्रे यांचे हातांची तसेच लाचेच्या रकमेची अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाशात तपासणी केली.लोकसेवक ब्राम्हणे यांनी लाच मागणीस प्रोत्साहन दिल्याने पोनि श्रीमती छाया देवरे,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अहिल्यानगर यांना लोकसेवक ब्राम्हणे यांना पंचायत समिती,राहुरी येथुन ताब्यात घेणेबाबत सुचना दिल्या.त्यानंतर षासकिय विश्रामगृह,राहुरी येथे लोकसेवक पटेल, लोकसेवक डुक्रे,पंच व सापळा पथकासह येवुन पंचनाम्याचे पुढील कामकाज केले.लोकसेवक ब्राम्हणे हे पंचायत समिती,राहुरी येथे मिळुन आले नाही त्यावेळी त्यांचे पुणे नाव व पत्त्याबाबत माहिती घेतली असता लोकसेवक ब्राम्हणे यांचे पुर्ण नाव,हुद्दा व पत्ता सचिन हौसिराम ब्राम्हणे,गृह निर्माण अभियंता (कंत्राटी),पंचायत समिती,राहुरी,ता.राहुरी जि-अहिल्यानगर,रा.समता नगर,वेताळ बाबा चैक,लोणी ता.राहता जि-अहिल्यानगर असे असल्याची माहिती मिळुन आली.

तरी दिनांक 30/06/2026 रोजी लाचमागणी पडताळणी दरम्यान 12/50 ते 13/16 व 14/03 ते 14/21 वाजेच्या दरम्यान ग्रामपंचायत,सात्रळ,ता.राहुरी जि.अहिल्यानगर येथे लोकसेवक डुके्र यांनी तक्रारदार यांच्याकडे तक्रारदार श्री.कडु यांचे घरकुल बांधकामाकरीता अनुदानाचा पहिला हप्ता 70,000/- रू.मंजुर करण्याच्या प्रक्रियेमध्ये मदत केल्याचे मोबदल्यात तसेच घरकुल बांधकामाकरीता मिळणा-या अनुदानाचे पुढील हप्ते मंजुर करण्याच्या प्रक्रियेमध्ये मदत करण्याकरीता लोकसेवक पटेल व लोकसेवक ब्राम्हणे यांचेकरीता 20,000/- रुपये लाचेची मागणी करून स्विकारण्याची संमती दर्षवली तसेच लोकसेवक पटेल यांनी तक्रारदार श्री.कडु यांचेकडे त्यांचे घरकुल बांधकामाकरीता अनुदानाचा पहिला हप्ता 70,000/- रू. मंजुर करण्याच्या प्रक्रियेमध्ये मदत केल्याचे मोबदल्यात तसेच घरकुल बांधकामाकरीता मिळणा-या अनुदानाचे पुढील हप्ते मंजुर करण्याच्या प्रक्रियेमध्ये मदत करण्याकरीता 20,000/- रुपये लाचेची मागणी केली व दिनांक 30/06/2026 रोजी सापळा कारवाई दरम्यान 14/48 ते 15/05 वाजेच्या दरम्यान श्री.जगताप यांचे किराणा दुकानाचे ठिकाणी लोकसेवक डुक्रे यांनी लाचेची रक्कम 20,000/- रूपये तक्रारदार श्री.कडु यांचेकडुन स्विकारली व त्यानंतर लोकसेवक डुक्रे यांनी लोकसेवक ब्राम्हणे यांना तक्रारदार कडु यांचेकडुन लाच स्विकारलेबाबत फोन द्वारे माहिती दिली असता लोकसेवक ब्राम्हणे यांनी लोकसेवक डुक्रे यांना तक्रारदार श्री.कडु यांचेकडुन लाच स्विकारण्यास प्रोत्साहन दिले आहे. म्हणुन लोकसेवक क्र. 1)हैदर याकुब पटेल, वय-56 वर्शे, पद-ग्रामसेवक,सात्रळ ग्रामपंचायत ता.राहुरी जि.अहिल्यानगर रा.वृंदावण काॅलनी,श्रीरामपुर ता.श्रीरामपुर जि-अहिल्यानगर, लोकसेवक क्र.2) ज्ञानदेव मोहन डुकरे वय-43 वर्शे, लिपीक (कंत्राटी),सात्रळ ग्रामपंचायत,ता.राहुरी जि-अहिल्यानगर, रा.डुक्रेवाडी, कॅनाॅलजवळ,सात्रळ ता.राहुरी जि. अहिल्यानगर लोकसेवक क्र. 3)सचिन हौसिराम ब्राम्हणे,गृह निर्माण अभियंता (कंत्राटी) पंचायत समिती राहुरी ता. राहुरी जि-अहिल्यानगर रा.समता नगर,वेताळ बाबा चैक,लोणी ता.राहता जि-अहिल्यानगर यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलम 7,12 प्रमाणे कायदेषीर फिर्याद आहे.

समक्ष हि फिर्याद दिली

( सविता तांबे )
पोलीस निरीक्षक
अँन्टी करप्षन ब्युरो,अहिल्यानगर

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) ***Registered the case and took up the investigation:***
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

Ravindra Narsinh Deshmukh(I (Inspector)) / **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S.**
**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** Ravindra Narsinh De

**Rank(पद):** I (Inspector)

**No.(सं.):**

पोलीस ठाणे अमलदार
राहुरी पोलीस स्टेशन,
जि. अहिल्यानगर